# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./ ८९ /२०२३ दिनांक : ०९/०२/२०२३

प्रति, **सुधारीत**

- ✓ मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये
- ✓ मा. सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग
- ✓ सर्व शिक्षक कर्मचारी, गों. वि. गडचिरोली व संलग्नीत महाविद्यालये
  गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- शिक्षक क्रीडा व कला महोत्सव - २०२३ करीता नोंदणी करण्याबाबत.. (सुधारीत सुचना)**

संदर्भ :- या कार्यालयाव्दारे प्रकाशीत सुचना क्र. 63/2023, दि. 03/02/2023

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांतील तसेच विद्यापीठातील पुर्णवेळ मान्यता प्राप्त शिक्षक (Approved Teachers) यांचेकरीता दि. २५ व २६ फेब्रुवारी, २०२३ दरम्यान प्रथमच क्रीडा व कला महोत्सव आयोजीत करण्यात येत असुन त्याअनुषंगाने संदर्भीय पत्रान्वये नोंदणी मागविण्यात आलेल्या आहेत.

सदर महोत्सवातील विविध क्रीडा व कला प्रकार खालीलप्रमाणे असुन सहभाग घेवू इच्छिणाऱ्या पुर्णवेळ मान्यता प्राप्त शिक्षकांची यादी संलग्नीत प्रपत्र (Details Entry Proforma) मध्ये महाविद्यालयाच्या लेटरहेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह संघ निहाय दि. १४ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेकडे हस्तपोच / टपालाव्दारे सादर करुन नोंदणी करण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

तथापी क्रीडा प्रकारात बुद्धीबळ व टेबल टेनिस तसेच कला प्रकारात एकपात्री प्रयोग समाविष्ट करण्याबाबत शिक्षकांनी केलेल्या मागणीनुसार सदर प्रकारांचा नव्याने समावेश करण्यात येत असुन त्याअनुषंगाने संबंधीतांनी नोंदणी करावी. तसेच मा. प्र-कुलगुरू महोदयांच्या निर्देशांनुसार संलग्नीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सदर महोत्सवात सहभागी होणाऱ्या शिक्षकांना दि. २५ फेब्रुवारी, २०२३ रोजीची कर्तव्य रजा मंजुर करावी.

नोंदणीचा अंतिम दि. १४ फेब्रुवारी, २०२३, नंतर येणाऱ्या नोंदणी स्वीकारल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**क्रीडा प्रकार -**

**(१)** क्रीकेट (पु) **(२)** व्हॉलीबॉल (पु.) **(३)** रस्साखेच (पु व म) **(४)** बॅडमिंटन (पु व म)
**(५)** संगित खुर्ची (म) **(६)** बुद्धीबळ (पु व म) **(७)** टेबल टेनिस (पु व म)

**कला प्रकार -**

**(१)** एकल गीत गायण (पु व म) **(२)** समुह गीत गायण (पु व म) **(३)** लघुनाटिका (पु व म)
**(४)** एकपात्री प्रयोग (पु व म)

**अटी :-**

सांघीक खेळांकरीता केवळ संघनिहाय नोंदणी स्विकारण्यात येतील. शिक्षक सांघीक खेळांमध्ये सहभाग घेण्यास ईच्छूक आहेत परंतु महाविद्यालयातील शिक्षकांची संख्या संघ तयार करण्यास अपूरी पडत असेल अशा परिस्थितीत शिक्षकांनी त्यांचे स्तरावरून इतर महाविद्यालयातील शिक्षकांशी संपर्क साधून संघ तयार करून संघ निहाय Detail Entry Proforma भरुन सादर करावा.

डॉ. अनिता लोखंडे
संचालक, क्रीडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव -

1) मा. कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2) मा. प्र- कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली